सरकार तर्फे साक्षीदार क्र. १४ | नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६
सरकार विरूध्द सुरेश
मी शपथपूर्वक खरे सांगतो की | निशाणी – ९३

माझे नाव – विपीन सुरेश मुग्धा
वय – अंदाजे ४४ वर्ष, व्यवसाय – नोकरी
राहणार – आयुक्त महानगरपालिका, चंद्रपूर

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जगताप यांच्या कडून –**

मी डिसेंबर २०१४ पासून जुलै २०१५ पर्यंत कामठी नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होतो. नगरपालिकेचे पुर्ण प्रशासन मुख्याधिकारी यांच्या कार्याचा भाग असतो. नागरिकांनी दिलेल्या तक्रारी स्वीकारणे व त्याची चौकशी करण्याचे कामही मुख्याधिकारी करत असतात. मी कार्यरत असताना प्रभाग ७ मधून काही तक्रारी माझ्या कडे आलेल्या होत्या. त्या तक्रारीमध्ये कामठी येथील दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत एकच काम दोन वेळा करण्यात आल्याचे आणि त्या कामाचे दोन वेळा पैसे उचलल्याबाबत तक्रारी होत्या. ते काम कॉन्क्रीट रस्त्याचे काम होते. त्या तक्रारीची मी चौकशी केली असता एका कामाची दोन वेळा ठराव झाल्याची मला दिसून आले. तसेच त्या एकाच कामाची दोन वेळा तांत्रिक मान्यता देण्यात आली होती.

२. तो रस्ता हॉकी बिल्डींग ते कांबळे याच्या घरापर्यंत करायचा होता. याच कामाची प्रशासकीय मान्यता दोन वेळा दिली असल्याची मला दिसून आले. या कामाला जिल्हाधिकारी यांनी नगरपालिकेला दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत दोन वेळा प्रशासकीय मान्यता दिली होती. त्या दरम्यान तांत्रिक सल्लागार म्हणून पी.एम.सी. नेमली होती त्याचे काम जी.पी. यादव यांना दिले होते. सदर काम तेव्हाचे अभियंता सुरेश बोरकर यांच्या अधिपत्त्याखाली होते.

३. कागदपत्र पाहिल्यानंतर मी सुरेश बोरकर व कार्यालयातील कनिष्ठ अभियंता व इतर स्टाफ असे कामाची पाहणी करण्याकरीता गेले. त्यावेळी कांबळे नावाचे नगरसेवक आमच्या सोबत होते. तेथे गेल्यानंतर हॉकी बिल्डींग ते कांबळे यांच्या घरापर्यंत कॉन्क्रीट रोड बांधलेला दिसून आला. बोरकर यांना ते काम दोनदा कसे करण्यात आले अशह विचारणा केली असता त्यांनी मला चुकीने एकाच कामाचे नाव दोन वेळा प्रशासकीय मान्यतेमध्ये नमूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. दुसरे काम रहाटे ते उज्ञेनवार यांच्या घरापर्यंत बांधकाम झाले आहे असे त्यांनी सांगितले. त्यांनी मला असेही सांगितले की दुस–या प्रशासकीय मान्यतेमध्ये रहाटे ते उज्ञेनवार यांचे घर असे लिहीणे अपेक्षित असताना त्यामध्ये हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे यांचे घर असा चुकीने उल्लेख करण्यात आला आहे.

४. सदरची बाब चुकीची असल्याचे माझ्या निदर्शनास आल्याने मी बोरकर यांना जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये सदरची बाब ठेवण्याबाबात निर्देश दिले. तश्या सुचना देउन नोटशीट जनरल बॉडीसमोर पाठविली. मला आता त्या नोटशीटची मुख्याधिकारी कामठी यांनी पडताळलेली प्रत दाखविली. त्या प्रतीवर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. (आरोपीच्या वकीलांनी

सदरची प्रत झेरॉक्स प्रत असल्याने त्यास निशाणी देण्यास हरकत घेतली व मुळ प्रत अभिलेखावर दाखल नसलयाने तिला निशाणी देता येणार नाही असे कथन केले. सरकारी वकीलांनी सदरची प्रत ही नगरपालिकेच्या ताब्यातील अभिलेखाची प्रत असून त्यावर मुख्ययाधिकारी यांची पडताळली म्हणून सही असल्याने तिला निशाणी देणे आवश्यक असल्याचे कथन केले. सदरची प्रत ही नगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या अभिलेखावरून तयार केलेली सत्य प्रत आहे. त्यावर तत्कालीन मुख्याधिकारी यांची सही आहे त्यामुळे सदरचा दस्त हा पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्याला निशाणी देणे आवश्यक आहे. सबब हरकत नामंजुर केली.) सदर दस्तास **निशाणी ९४** देण्यात येते.

५. हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे यांच्या घराच्या दरम्यान बांधलेल्या रस्त्याचा खर्च/देयक हा अंदाजे १४ लाख इतक्या रकमेचा होता. रहाटे ते उज्ञेनवार यांच्या घराच्या दरम्यान बांधलेल्या रस्त्याचा खर्च जवळपास ६ ते ७ लाख इतक्या रकमेचा होता. या प्रमाणे दोन बिले अदा करण्यात आली आहे.

६. या प्रकरणामध्ये एकाच कामाचे दोन वेळा रकमा उचलल्या असल्याचे निदर्शनास आल्याने मी ते जनरल बॉडीसमोर ठेवणे आवश्यक असल्याने तशी नोटशीट जनरल बॉडीसमोर ठेवली. अभियंताच्या सांगण्यानूसार दुस–या कामाच्या नावाऐवजी हॉकी बिल्डींग ते आसाराम कांबळे यांचे घर अश्या चुकीच्या नावाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. माझ्या तपासानूसार यामध्ये पी.एम.सी. जयप्रकाश यादव व अभियंता सुरेश बोरकर हे दोघे दोषी होते.

७. मी फिर्यादी रवींद्र पांढरे यांना ओळखतो. ते मुख्याधिकारी होते. त्यांनी फिर्याद दिली होती का हे मला माहिती नाही मात्र फिर्याद दिली होती हे मला माहिती आहे. मी न्यायालयात हजर असलेले आरोपी सुरेश बोरकर व जयप्रकाश यादव यांना ओळखतो. ते दोघेही आज न्यायालयात हजर आहे. उर्वरीत आरोपींना मी ओळखत नाही.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू –**

८. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ९४ कडे अहवाल माझ्या हस्ताक्षरात नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ९४च्या दुस–या पानावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे आहे की दुसरे पान पडताळलेले दिसत नाही. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ९४ कडील दस्त हा बनावटी आहे.

**मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास दुपार पर्यंत तहकुब.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

Sd/–
(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक २१/०७/२०२५

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १४</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u>**

**सरकार विरूध्द सुरेश**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की** **निशाणी – ९३ पुढे चालू**

**मध्यंतरानंतर उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू –**

९. हे म्हणणे खरे आहे की नगरपालिकेचे काम करण्यापूर्वी त्याबाबत जाहिरात प्रसिध्द करावी लागते. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर कोटेशन व टेंडर घेतले जाते. हे म्हणणे खरे आहे की जो व्यक्ती कमीत कमी रकमेचे कोटेशन भरतो त्याच्या नावे टेंडर दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की निश्चीत केलेल्या कामाला किती खर्च लागेल याचे अंदाजपत्रक अभियंताद्वारे पहिल्यांदा काढले जाते. हे म्हणणे खरे आहे की वादातील कामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक आरोपी क्र. २ जयप्रकाश यादव यांनी काढले होते. हे म्हणणे खरे नाही की खर्चाचे अंदाजपत्रक जनरल बॉडीसमोर ठेवावे लागते. हे म्हणणे खरे आहे की कामाला व खर्चाला मान्यता जनरल बॉडी देतो. हे म्हणणे खरे आहे की खर्चाचे अंदाजपत्रक देण्यासाठी जयप्रकाश यादव यांच्यासोबत नगरपालिकेचा करार झाला होता. व त्याप्रमाणे ते अंदाजपत्रक देत होते.

१०. अंदाजपत्रक दिल्यानंतर जयप्रकाश यादव यांची जबाबदारी संपते का हे मला निश्चीत सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की खर्चाचे पैसे संबंधीत कंत्राटदाराच्या खात्यावर चेक द्वारे दिले जाते. जेवढे काम झाले आहे तेवढे पैसे दिले आहेत का हे मी निश्चीत सांगू शकत नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की आम्ही जोपर्यंत एखादया व्यक्तीला खर्चाचे अंदाजपत्रक काढा अशी वर्क ऑर्डर देत नाही तोपर्यंत तो व्यक्ती अंदाजपत्रक देत नाही. हे म्हणणे खरे आहे की एखादया व्यक्तीला जास्तीचे पैसे नगरपालिकेकडून अदा केल्यास ते पैसे नगरपालिका वसूल करते. हे म्हणणे खरे आहे की आरोपींना जास्तीचे पैसे दिले असल्याने ते परत करा असे पत्र नगरपालिकेतर्फे पाठविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की पी.एम.सी. म्हणजे दोन बाबी असून एक सुपरवाईज करणे व दुसरे अंदाजपत्रक तयार करणे हे आहे. जयप्रकाश यादव यांनी कामाचे सुपरवीजन करावे असे पत्र अभिलेखावर दाखल आहे का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या तपासानूसार सुरेश बोरकर व जयप्रकाश यादव हे दोषी असल्याचे दिसून आल्याचे मी खोटे सांगतो.

**आरोपी क्र. ३ तर्फे उलटतपास संपला.**

**आरोपी क्र.१, २ व ४, ५ यांच्या तर्फे वकील श्री. अढाउ यांनी आरोपी क्र. ३ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकारला.**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

Sd/–

कामठी
दिनांक २१/०७/२०२५

(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

| | |
|---|---|
| <u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. १५</u> | <u>नि.फौ.ख.क्र.१२७/२०१६</u><br>सरकार विरूध्द सुरेश |
| मी शपथपूर्वक खरे सांगतो की | निशाणी – ९५ |

**माझे नाव** – **आशिष नथ्थून चेचरे**
**वय** – **अंदाजे ३९ वर्ष, व्यवसाय – सहा. पोलिस निरीक्षक**
**राहणार** – **पोलिस स्टेशन धाड, जि. बुलढाणा**

**सरतपास सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जगताप यांच्या कडून –**

मी २०१५ मध्ये कामठी पोलिस स्टेशन मध्ये पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्य करत होतो. दि.०३.१२.२०१५ रोजी रवींद्र पांढरे हे आमच्या पोलिस ठाण्यात आले होते. दलीत वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कामठी नगरपरिषदेमध्ये अफरातफर झाली असल्याची त्यांची तक्रार होती. पी.आय. उत्तम मुळक यांनी मला गुन्हा दाखल करून घेण्याचे आदेश दिले. मला आता निशाणी ३९ दाखविले. तो तोच आहे. त्यावर रविंद्र पांढरे यांची सही असून पोलिस निरीक्षक यांची सही आहे. त्या सहया मी ओळखतो. त्यानंतर मी भा.द.वी. कलम ४२०, ४६५ व इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला. मला आता निशाणी ४० कडील फिर्याद दाखविली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. त्यानंतर या गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्याकडे वर्ग झाला. मी फक्त फिर्याद नोंदवून घेतली आहे. या गुन्हेचा तपास अजाबसिंग जाडवर यांनी केला.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी क्र.३ तर्फे वकील श्री. कांबळे यांच्या मार्फत सुरू –**

२. मी २००५ साली नोकरीला लागलो. त्यानंतर मी २०१२ साली परिक्षा देउन पी.एस.आय. म्हणून निवडला गेलो. हे म्हणणे खरे नाही की दि.०१.०१.२०१५ पासून सी.सी.टि.एन.एस. लागू झाली. हे म्हणणे खरे आहे की त्यामध्ये सर्व एफ.आय.आर. ऑनलाईन कराव्या लागत होत्या. हे म्हणणे खरे आहे की प्रस्तुत गुन्हयातील एफ.आय.आर. ऑनलाईन नाहीत.

३. या गुन्हयाची दुसरी डायरी कोणी लिहीली हे मला आता आठवत नाही. मी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्याकडे डायरी जमा केली होती. पोलिस निरीक्षक यांच्या आदेशावरून गुन्हा स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्याकडे तपासासाठी गेला. त्या आदेशाची प्रत दोषारोप पत्रासोबत लावली आहे का याची मला माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की तपासी अधिका–याने ते लावले आहे का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलिस ठाण्यातून दुसरीकडे तपासा हलविण्यासाठी एस.पी. यांची परवानगी लागते. हे म्हणणे खरे आहे की त्याची नोंद स्टेशन ठाणे दैनंदिनी मध्ये करावी लागते. कामठी पोलिस ठाण्यात पी.आय.(पोलिस स्टेशन अधिकारी) माझे वरीष्ठ होते. हे म्हणणे खरे आहे की पोलिस ठाण्यात ज्या काही घडामोडी होत होत्या त्या पी.आय. साहेबांच्या आदेशावरून होत होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्याच्या नोंदी ठाणे दैनंदिनी मध्ये घेतल्या जात होत्या.

४.		हे म्हणणे खरे नाही की सदरचे प्रकरण स्थानिक राजकीय दबावामुळे मी परस्पर स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांच्याकडे पाठविले. हे म्हणणे खरे  नाही की त्यामुळे त्याची नोंद मी ठाणे दैनंदिनी मध्ये घेतले नाही.

**आरोपी क्र. ३ तर्फे उलटतपास संपला.**

**आरोपी क्र.१, २ व ४, ५ यांच्या तर्फे वकील श्री. अढाउ यांनी आरोपी क्र. ३ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकारला.**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.
समक्ष

Sd/-
(मोहन रा. कामत)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्या.क्र. १, कामठी

कामठी
दिनांक  २१/०७/२०२५